# ग्राहकांना होणारे वीजेचे अपघात टाळण्यासाठी सुरक्षा उपाय योजना

१) ग्राहकांमध्ये सुरक्षेविषयी जागृती करण्यासाठी उप-विभाग , विभाग व मंडळ कार्यालय पातळीवर ग्राहक सुरक्षा अभियान राबवणे.

२) शाळा , महाविद्यालय , तंत्रनिकेतन , आय. टी. आय इत्यादी ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन 'विद्युत सुरक्षा' या विषयावर चित्रफित दाखवणे व मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करणे.

३) अपघाताचे चौकशीदरम्यान संबंधित अधिकारी व कर्मचा-यांशी अपघातांची कारणमीमांसा व ते टाळण्यासाठी उपाय यावर चर्चा करणे जेणेकरून पुन्हा अपघाताची पुनरावृत्ती होणार नाही.

४) विद्युत सुरक्षेविषयी ग्राहक व जनतेत जागरूकता निर्माण करण्यासाठी चौका-चौकातून रॅली काढणे , सुरक्षेविषयीच्या पोस्टर्सने तसेच हातोहात पत्रके वाटून सुरक्षेचे महत्व पटवून देणे.

५) गर्दीच्या ठिकाणी उदा. रेल्वे स्टेशन , बस स्टँड , शाळा , कॉलेज , बाजारपेठ याठिकाणी सुरक्षेविषयी होर्डिंग / बॅनर्स लावणे.

६) शाखा कार्यालये , ग्रामपंचायत कार्यालय व इतर सार्वजनिक ठिकाणी पोस्टर लावणे , दवंडी पिटवणे तसेच वृत्तपत्रातून प्रसिद्धी देणे इत्यादी मार्गाने ग्राहकांचे प्रबोधन करणे.

७) विद्युत सुरक्षा कार्यक्रमात ग्राहकांना सक्षम अर्थिंग , योग्य वायरिंग , इ. एल. सी. बी. इत्यादीचे महत्व व वापर सांगणे तसेच अपघात होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी हे चित्रस्वरूपातील पोस्टर्सद्वारे पटवून देणे.

MSEDCL